भिवंडीत उद्यापासून १५ दिवसांचा लॉकडाऊन

भिवंडी महानगरपालिका महासभेने दिली मंजुरी

वार्ताहर

भिवंडी ,दि.१६ –१ जून पासून सुरू झालेल्या अन लॉक डाऊन काळात भिवंडी शहरात अचानक कोरोना रुग्ण वाढ होण्यास सुरुवात होऊन शहरातील परिस्थिती भयावह झाल्याने महानगरपालिका सभागृहात मंगळवारी आयोजित केलेल्या विशेष सर्वसाधारण सभेत सोशल डिस्टेंसिंग चे पालन करीत कोरोना परिस्थितीवर तीन तास झालेल्या चर्चे नंतर पिठासन अधिकारी महापौर प्रतिभा पाटील यांनी सभागृहाच्या संमतीने येत्या गुरुवार पासून पंधरा दिवसां करीता विशेष लॉक डाऊन जाहीर करीत असल्याची घोषणा केली .

या विशेष महासभेत बहुतांश नगरसेवकांनी शहरात कोरोना रुग्णांच्या संख्येत दिवसेंदिवस होत असलेल्या वाढीस प्रशासनाचा गलथान पणा जबाबदार असल्याचा आरोपाचा भडिमार केला .

नगरसेवक फराद बाबा बहाउद्दीन यांनी शहरातील भीषण वास्तव सभागृहात मांडताना शहरातील कोरोना मृतांची संख्या प्रशासन लपवत असल्याचा आरोप करीत शहरातील विविध कब्रस्तान मध्ये मागील पाच दिवसात किमान २५० कोरोना बधितांचा मृत्यू झाल्याचा गौप्यस्फोट केला . रुग्णांना रुग्णवाहिका मिळत नसल्या बाबत तर काही रुग्णवाहिका चालकां कडून अव्वाच्या सव्वा पैसे उकळले जात असल्याची माहिती सभागृहा समोर नगरसेवकांनी मांडली,

शहरातील रुग्णांसाठी जी रुग्णालये ताब्यात घेतली त्या पैकी एकही रुग्णलाय सुस्थितीत सुरू नसून ताडाळी येथे मनपाने खाजगी कोव्हिडं रुग्णालय म्हणून सुरू केलेले श्री व–हाळ देवी रुग्णालय त्वरित बंद करावे अशी मागणी नगरसेवकांनी केली .

तर सभागृह नेता विलास पाटील व नगरसेवक संतोष शेट्टी यांनी आमदार रईस शेख यांनी आयएसआय आयुक्त नियुक्तीच्या मागणीचा समाचार घेताना ते जेथे राहतात तेथे त्यांनी काही केले नाही मुंबई महानगपालिकेत ते नगरसेवक आहेत तेथे पाच आयएसआय दर्जाचे अधिकारी असताना परिस्थिती हाता बाहेर गेली त्यांनी महानगरपालिकेला फुकटचे सल्ले देण्याचा प्रयत्न करू नये असा घणाघात केला .

या सर्व चर्चेला उत्तर देताना आयुक्त डॉ प्रवीण आष्टीकर यांनी प्रशासन चोवीस तास सतर्क राहून कार्यरत आहे काही चूका मागील काळात झाल्या असतील त्या नक्की सुधारून लोकप्रतिनिधी व शहरातील नागरिकांच्या सहकार्यातून कोरोना वर मत करण्यासाठी ३५० बेड चे रुग्णालय उभारणीस लवकर सुरवात करीत असल्याचे सांगितले .

तर महापौर प्रतिभा पाटील यांनी शहरात कोरोना चा प्रादुर्भाव वाढत असताना सर्वानीच काळजी घेणे गरजेचे असल्याने त्याच साठी फक्त औषध व्यतिरिक्त दूध किराणा ठराविक वेळे साठी उघडे ठेवून ,तर तिनबत्ती भाजीमार्केट बंद ठेवून पंधरा दिवसांचा कडक लॉक डाऊन लावला जाणार असल्याची घोषणा केली व या बाबत पोलीस व जिल्हा प्रशासना सोबत राज्य सरकार ला कळविण्यात आल्याचे सांगितले.

मुलीला कोरोनाची लागण झाल्याचे लपवणे पडले महागात, कर्मचारी निलंबित

प्रतिनिधी

नागपूर, दि. १६ – दिल्लीहून विमानाने वेकोलि चनकापूर वसाहतीत आलेल्या वेकोलि कर्मचाऱ्याच्या मुलीला कोरोनाची लागण झाल्याचे समजताच स्थानिक प्रशासनाला अंधारात ठेवण्याच्या कारणामुळे प्रशनासाची दिशाभूल केल्याप्रकरणी नागपूर क्षेत्र महाव्यवस्थापक डी.एम. गोखले यांनी कोरोनाबाधित मुलीच्या वडिलांना निलंबित केले आहे. निलंबित कर्मचारी वेकोलिच्या सिल्लेवाडा खाणीतील गायनिंग विभागात कार्यरत आहे.

दिल्लीहून विमानाने प्रवास करून सदर कर्मचाऱ्याची मुलगी चनकपूर येथे घरी परत आली होती. चनकापूर वेकोलि बी–टाईप वसाहतीत राहणारी मुलगी दिल्ली येथे शिक्षणासाठी गेली होती, असे समजते. दिल्लीहून घरी आल्यानंतर त्या मुलीला घरीच वेगळ्या रुममध्ये क्वारंटाईन ठेवण्यात आले होते. परंतु, मुलीच्या वडिलांनी स्थानिक प्रशासनापासून ही माहिती लपवून ठेवली. त्यांनी मुलीला घरीच ठेवले. ग्रामपंचायत आरोग्य विभाग, पोलिस विभाग अथवा वेकोलि प्रशासनाला त्यांनी अवगत केले नाही. यानंतर अचानक मुलीची तब्येत बिघडली असता तिला वलनीतील वेकोलिच्या रुग्णालयात उपचारासाठी दाखल करण्यात आले होते. वैद्यकीय अधिकाऱ्यांना तिची लक्षणे संशयित वाटताच लागलीच तिला रुग्णवाहिकेने नागपूरच्या मेयो हॉस्पिटलमध्ये रवाना केले. दरम्यान तिचा कोरोना चाचणी अहवाल सकारात्मक आला. एकीकडे स्थानिक प्रशासनाने या विषयाबाबत वेकोलिविरोधात नाराजी व्यक्त केली होती. याचा परिणाम म्हणून वेकोलिच्या महाव्यवस्थापकांनी मुलीच्या वडिलांना पुढील आदेशापर्यंत निलंबित करणायाचा निर्णय घेतला.

सरकारी लॅबमधील अहवाल चार दिवसांपासून प्रलंबित

आठ दिवसांपासून ३० रुग्ण आमंत्रामध्ये बघत आहेत अहवालाची वाट

वार्ताहर

उल्हासनगर, दि. १६ – उल्हासनगर महापालिका क्षेत्रातील संदिग्ध कोरोना रुग्णाच्या चाचण्या करणारी एनआयव्ही हि लॅब गेल्या तीन दिवसांपासून बंद आहे, यामुळे उल्हासनगर शहरातील ३०० पेक्षा अधिक रहिवाश्यांचे प्रथम तपासणी अहवाल प्रलंबित आहेत. विशेष म्हणजे टाटा आमंत्रा विलगीकरण केंद्रात डिस्चार्जची वेळ आलेल्या ३० रहिवाश्यांची कोरोना चाचणी गेल्या आठ दिवसांपासून आलेली नाही.

उल्हासनगर शहरातील कोरोना रुग्णांची संख्या हि ७८६ झाली आहे. अश्या परिस्थितीत कोरोना रुग्णांच्या निकटवर्तीय संपर्कात असलेल्या रहिवाश्याचे विलगीकरण करण्यात येते. त्याचे रेड क्रॉस रुग्णालयात स्वाब घेऊन एनआयव्ही ह्या शासकीय प्रयोग शाळेत पाठविले जाते. तिथे त्यांची तपासणी हि दोन दिवसात होऊन चाचणी अहवाल येणे अपेक्षित असते. मात्र हे अहवाल प्रत्यक्षात चार ते सहा दिवसांनी येत होते. तीन दिवसांपूर्वी एनआयव्ही हि लॅब सात दिवसांसाठी बंद करण्यात आली आहे. ह्या लॅब मध्ये काम करणाऱ्या दोन कर्मचाऱ्यांना कोरोनाची लागण झाली असल्यामुळे हा निर्णय घेतला गेला असल्याचे समजते. यामुळे ह्या लॅब मध्ये प्रलंबित असलेले अंदाजे ३०० चाचण्या ह्या हापकीन लॅब मध्ये तपासणीसाठी पाठविल्या आहेत. या चाचण्यांचे अहवाल हि गेल्या दोन दिवसांपासून आलेले नाही. त्यामुळे खाजगी लॅबकडून येणाऱ्या तुरळक अहवालांवर शहरातील कोरोना वार्तापत्र प्रसिद्ध केले जात आहे. याबाबत पालिका आयुक्त समीर उन्हाळे याना विचारले असता त्यांनी माहिती नसल्याप्रमाणे वागत जनसंपर्क अधिकाऱ्यांकडून माहिती घेण्यास सांगितले.

प्रत्येक पॉसिटीव्ह रुग्णाच्या मागे २० ते ३० निकटवर्तीयांचे विलगीकरण करण्यात येते. त्यापैकी पॉसिटीव्ह येणाऱ्या रुग्णांच्या निकटवर्तीयांचे वलगीकरण करण्यात येते. हि प्रक्रिया कोरोनाची साखळी तुटण्यासाठी जितक्या जलद करता येईल, तितक्या लवकर करणे गरजेचे असते. जर सात सात दिवस अहवालच प्रलंबित राहिले तर हि साखळी तोडणे पालिका प्रशासनाला कठीण होऊन शहरात कोरोनाचा उद्रेक होण्याची दाट शक्यता आहे.

मेट्रोपोलीस देणार महिन्याला पाच हजार चाचण्या मोफत

उल्हासनगर महापालिकेने तात्काळ अहवाल देणाऱ्या मेट्रो पोलीस ह्या खाजगी लॅब बरोबर करार केला आहे. ह्या करारांतर्गत महिन्याला पाच हजार चाचण्या मेट्रो पोलीस हि कॉर्पोरेट सोशल रिस्पॉन्सिबिलिटी फंडच्या माध्यमातून मोफत देणार आहे. यामुळे आता तरी चाचण्या वेळेत येतील अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

विदर्भात वीज कोसळून दोन ठार

प्रतिनिधी

चंद्रपूर, दि. १६ – चंद्रपूर व भंडारा जिल्ह्यात वीज कोसळून दोघांचा मृत्यू झाला. यामध्ये एक शेतकरी व एक महिलेचा समावेश आहे.

चंद्रपूर जिल्ह्यातील राजुरा तालुक्यातील भेंडवी येथील संतोष सलाम यांच्या शेतात मजुरी करण्यास गेलेल्या सुनंदा बावणे या महिलेचा वीज पडून जागीच मृत्यू झाला. पावसाळ्याला सुरुवात झाली असून शेतात पेरण्या सुरू झाल्या आहेत. भेंडवी येथील संतोष सलाम यांच्या शेतातही कापूस टिबण्याचे काम सुरू झाले आहे. कामासाठी शेत मालकाने गडचांदूर येथील मजूर कामाला आणले होते. या कामासाठी गडचांदूर येथील वॉर्ड क्रमांक ७ मध्ये वास्तव्यास असणारी महिला सुनंदा बावणे काम करत असताना वीज कोसळल्याने जागीच मृत्युमुखी पडली. घटनेची माहिती मिळताच तहसीलदार डॉ. रवींद्र होळी घटनास्थळी रवाना झाले असून पंचनामा तसेच इतर शासकीय कार्यवाही सुरू आहे.

तसेच, भंडारा जिल्ह्यातील मोहाडी तालुक्यातील घोरपड येथे वीज पडून एका शेतकऱ्याचा मृत्यू झाला.

भाजपचे जळगाव जिल्हाध्यक्ष हरिभाऊ जावळे यांचे निधन

प्रतिनिधी

जळगाव, दि. १६ – रावेर विधानसभा मतदार संघाचे माजी खासदार, आमदार तथा भाजपचे विद्यमान जिल्हाध्यक्ष हरिभाऊ जावळे यांचा उपचारादरम्यान मुंबई येथे मृत्यू झाला.

त्यांच्या निधनामुळे संपूर्ण जळगाव जिल्ह्यात हळहळ व्यक्त करण्यात आहे. हरिभाऊ जावळे यांच्या पश्चात कुटुंबात आई, पत्नी, एक मुलगी दोन मुले असा परिवार आहे.

हरिभाऊ जावळे यांना कोरोनाची लागण झाल्याचे ३ जून रोजी स्पष्ट झाले होते. त्यानंतर त्यांना उपचारांसाठी तातडीने मुंबईला हलवण्यात आले होते. मागील काही दिवसांपासून त्यांच्यावर उपचार सुरु होते. परंतु आज दुपारी उपचार घेत असताना त्यांची प्राणज्योत मालवली. दरम्यान, हरिभाऊ जावळे दोन वेळा आमदार तथा दोन वेळा खासदार म्हणून निवडून आले होते. तसेच त्यांनी मधुकर सहकारी साखर कारखान्याचे चेअरमनपददेखील भूषवले होते.

दरम्यान, हरिभाऊ जावळे यांची मागील वर्षी महाराष्ट्र कृषी व संशोधन परिषदेच्या उपाध्यक्ष पदावर नियुक्ती करण्यात आल्यामुळे त्यांना कॅबिनेट मंत्रिपदाचा बहुमान मिळाला होता.

श्रीवर्धन तालुक्यात पावसाची संततधार

वार्ताहर

श्रीवर्धन, दि. १६ – श्रीवर्धन तालुक्यात काल दुपारपासून पावसाची संततधार सुरू आहे. काही वेळेला पावसाच्या प्रमाणात वाढ होत असून मोठ्या सरीदेखील कोसळत आहेत. विजांचा कडकडाट व ढगांचा गडगडाटही सुरू आहे. पावसामुळे वातावरणात गारवा आला आहे. समुद्रसुद्धा मोठ्या प्रमाणात खवळलेला दिसत आहे.पावसाची सुरुवात चांगली झाली असल्याने टँकरने पाणीपुरवठा होत असलेल्या गावांना दिलासा मिळणार आहे. तालुक्यातील अनेक शेतकऱ्यांनी निसर्ग चक्रीवादळ होण्याअगोदरच आपल्या शेतामध्ये धूळ वाफेचे पेरे केले होते. त्यामुळे वादळाबरोबर झालेल्या मुसळधार पावसामुळे शेतकऱ्यांनी पेरलेले राबदेखील चांगल्या प्रकारे उगवले आहेत. साधारण महिनाभरात भातलावणीच्या कामाला सुरुवात होईल, असे शेतकऱ्यांमधून बोलले जात आहे.

दुसरीकडे, पावसाळ्याला सुरुवात झाल्यामुळे बाजारपेठेत मोठ्या प्रमाणात गर्दी पाहायला मिळत होती. प्लॅस्टिकचे कापड, छत्र्या, रेनकोट इत्यादी खरेदी करण्यासाठी नागरिकांची गडबड दिसून येत आहे. गेल्या वर्षी सरासरीपेक्षा जास्त पाऊस श्रीवर्धन तालुक्यात झाला होता. या वर्षीही सरासरीइतका पाऊस पडेल, असा हवामान खात्याने अंदाज वर्तवला आहे.

रेल्वेच्या कोचमध्ये कोरोनाग्रस्तांसाठी १६० खाटांची व्यवस्था

प्रतिनिधी

नागपूर, दि. १६ – जून, जुलै महिन्यात कोरोनाबाधित आणि संशयितांशी संख्या वाढण्याची शक्यता वर्तविण्यात आली होती. या पृष्ठभूमीवर राज्य शासनाच्या अखत्यारीतील भवन राखीव ठेवले. यासोबतच रेल्वेलाही सज्ज ठेवण्याचे निर्देश होते. मध्य रेल्वेच्या नागपूर विभागाने तातडीने ६० कोचमध्ये १५० क्वारंटाईन बेड तयार करून ते सज्ज ठेवले आहेत. संशयितांची संख्या वाढल्यास आणि जागा अपूरी पडल्यास संशयितांना रेल्वे डब्यातील बेडमध्ये ठेवले जाईल, मात्र अद्याप उपराजधानीत अशी वेळ आली नाही.

कोरोनाच्या प्रसारावर नियंत्रण मिळवण्यासाठी केंद्र आणि राज्य सरकार शक्य ती उपाययोजना करत आहेत. कोरोनाबाधितांवर मेयो, मेडिकल रुग्णालयात उपचार सुरू आहेत. नागपूर शहरात आतापर्यंत गड्डीगोदाम, मोमीनपूरा, सतरंजीपूरा, टिमकी आदी परिसर सील करून तेथील संशयितांना आमदार निवास, रविभवन, शेतकरी प्रशिक्षण संस्था, महाविद्यालय, पोलिस क्वार्टर आदी ठिकाणी ठेवण्यात आले आहेत.

राष्ट्रीय कंपनी विधी न्यायाधिकरणासमोर
मुंबई खंडपीठ
सी.ए.(सीएए) ४००९/एमबी/सी–IV/२०१९
सी.ए.(सीएए) ४००५/एमबी/सी–IV/२०१९
सी.ए.(सीएए) ४०४९/एमबी/सी–IV/२०१९
कंपनी अधिनियम, २०१३ च्या प्रकरणात.
आणि
कंपनी अधिनियम, २०१३ चे कलम २३० ते २३२ आणि कंपनी अधिनियम, २०१३ च्या इतर संबंधित तरतुदींच्या प्रकरणात.
आणि
क्रिपा ट्रेडिंग प्रायव्हेट लिमिटेड, पहिली हस्तांतरक कंपनी आणि **प्युरिका फूडस् प्रायव्हेट लिमिटेड,** दुसरी हस्तांतरक कंपनी सह **रूप कमर्शियल्स प्रायव्हेट लिमिटेड,** हस्तांतरिती कंपनीच्या एकत्रिकरणाच्या योजनेच्या प्रकरणात.

क्रिपा ट्रेडिंग प्रायव्हेट लिमिटेड,
कंपनी अधिनियम, १९५६ अंतर्गत स्थापित कंपनी, जिचे नोंदणीकृत कार्यालय आहे, १४७, १४ वा मजला, अटलांटा, नरिमन पॉईंट, मुंबई–४०००२१, महाराष्ट्र.
CIN:-U51909MH2009PTC163310
...**पहिली अर्जदार/**
पहिली हस्तांतरक कंपनी.

प्युरिका फूडस् प्रायव्हेट लिमिटेड,
कंपनी अधिनियम, १९५६ अंतर्गत स्थापित कंपनी, जिचे नोंदणीकृत कार्यालय आहे, १४७, १४ वा मजला, अटलांटा, नरिमन पॉईंट, मुंबई–४०००२१, महाराष्ट्र.
CIN:-U15549MH2012PTC228584
...**दुसरी अर्जदार/**
दुसरी हस्तांतरक कंपनी.

रूप कमर्शियल्स प्रायव्हेट लिमिटेड,
कंपनी अधिनियम, १९५६ अंतर्गत स्थापित कंपनी, जिचे नोंदणीकृत कार्यालय आहे, १४७, १४ वा मजला, अटलांटा, नरिमन पॉईंट, मुंबई–४०००२१, महाराष्ट्र.
CIN:-U51909MH2006PTC163205
...**तिसरी अर्जदार/**
हस्तांतरिती कंपनी.
(यानंतर एकत्रित ''अर्जदार कंपन्या'' असा उल्लेख)

सूचना

सूचना याद्वारे देण्यात येते की, दिनांक १२ जून, २०२० रोजीच्या आदेशानुसार राष्ट्रीय कंपनी विधी न्यायाधिकरणाच्या मुंबई खंडपीठाने निर्देश दिले आहेत की, **क्रिपा ट्रेंडिग प्रायव्हेट लिमिटेड** (यानंतर ''पहिली हस्तांतरक कंपनी'' असा उल्लेख) आणि **प्युरिका फूडस् फूडस् प्रायव्हेट लिमिटेड** (यानंतर ''दुसरी हस्तांतर कंपनी'' असा उल्लेख) (यानंतर एकत्रित ''हस्तांतरक कंपन्या'' असा उल्लेख) सह रूप कमर्शियल्स प्रायव्हेट लिमिटेड (यानंतर ''हस्तांतरिती कंपनी'' असा उल्लेख) यांच्या एकत्रिकरणाच्या प्रस्तावित योजनेकरिता **क्रिपा ट्रेडिंग प्रायव्हेट लिमिटेड, प्युरिका फूडस् प्रायव्हेट लिमिटेड** आणि रुप कमर्शियल्स प्रायव्हेट लिमिटेड च्या समभाग धारकांची आणि **क्रिपा ट्रेडिंग कमर्शियल्स प्रायव्हेट लिमिटेड** आणि **रुप कमर्शियल्स प्रायव्हेट लिमिटेड** च्या प्रेफरन्स भागधारकांनी सर्व अर्जदार कंपन्यांच्या सर्व भागधारकांनी शपथपत्रावर सहमती दिली असल्यामुळे ते आवश्यक नाहीत यांची सभा घ्यावी आणि राष्ट्रीय कंपनी विधी न्यायाधिकरणासमोर नोंदी ठेवाव्यात.

सदर आदेश आणि त्यातील निर्देशानुसार पुढे सूचना याद्वारे देण्यात येते की कोणीही सदर अर्जाच्या बाजूने किंवा विरोधात जाण्यास इच्छुक असल्यास सदर सूचना प्रसिद्धी तारखेपासून तीस दिवसांत त्यांच्या किंवा त्यांच्या वकिलांद्वारे सही केलेली त्यांच्या हेतूची सूचना अर्जदार कंपन्यांचे कार्यरत चार्टर्ड अकाऊंटंटस् यांचेकडे पाठविणे आवश्यक आहे. विरोधाची पार्श्वभूमी किंवा शपथपत्राची प्रत अशा सूचनेसह पाठविणे आवश्यक आहे.

अर्जाची प्रत कोणाही धनकोंना आवश्यकता असल्यास त्यासाठी विहित प्रभार प्रदान केल्यावर अर्जदारांचे कार्यरत कंपनी सचिव यांच्याकडून पुरविण्यात येईल.
सदर दिनांक १७ जून, २०२०

सही/–
मे. ए. टी. जैन अॅण्ड कं.
कार्यरत चार्टर्ड अकाऊंटंटस्
अर्जदारांकरिता
२१२, रेवा चेंबर्स, ३१,
न्यू मरिन लाईन्स, मुंबई – ४०००२०

ORICON ENTERPRISES LTD.
सीआयएन:एल२८१००एमएच१९६८
पीएलसी०१४१५६
नोंदणी कार्यालय : १०७६,
डॉ. ई–मोझेस रोड, वरळी, मुंबई–४०० ०१८,
वेबसाईट : www.oriconenterprises.com,
ई–मेल : share@ocl-india.com
फोन क्र. : ०२२–४३६६२२००,
फॅक्स क्र. : ०२२–२४९६३०५५

सूचना

सेबी (लिस्टिंग ऑब्लिगेशन्स अॅण्ड डिस्क्लोजर रिक्वायरमेंटस्), रेग्युलेशन्स, २०१५ चे रेग्युलेशन ४७ सहवाचता रेग्युलेशन २७(१) (ए) अनुसार सूचना याद्वारे देण्यात येते की, कंपनीच्या संचालक मंडळाची सभा ही ३१ मार्च, २०२० रोजी संपलेली तिमाही/वर्षाकरिता कंपनीचा अलिप्त आणि एकत्रित लेखापरिक्षित वित्तीय निष्कर्ष इतर बाबीसह विचारात घेणे आणि मंजूर करण्यासाठी शुक्रवार, २६ जून, २०२० रोजी घेण्यात येणार आहे.
सदर माहिती कंपनीची वेबसाईट www.oriconenterprises.com आणि स्टॉक एक्स्चेंजची वेबसाईट www.bseindia.com आणि www.nseindia.com वर सुद्धा उपलब्ध आहे.
मंडळाच्या आदेशाद्वारे
ओरिकॉन एंटरप्रायझेस लिमिटेड करिता
सही/–
दिनांक : १६.०६.२०२० **संजय जैन**
ठिकाण : मुंबई कंपनी सचिव

जाहीर सूचना

सूचना याद्वारे आम जनतेस देण्यात येते की, (दिवंगत) श्री. विट्ठला वेंकन्ना शेट्टी (**''मयत''**) यांच्या नोंदणीकृत अंतिम मुखत्यार व मुखत्यारपत्र दि. २२ मे, २०१८ रोजीच्या प्रोबेटकरिता मुंबई येथे कार्यकक्षेच्या सन्मा. उच्च न्यायालयामध्ये माझे अशील, श्री. वल्सराज नायर यांच्याद्वारे मृत्युपत्र याचिका, मृत्युपत्र याचिका क्र. २९०/२०२० दाखल केली होती जे **(१)** फ्लॅट क्र. ९७, बिल्डींग क्र. ५, जय शास्त्री नगर सीएचएसएल, मुलुंड कॉलनी, मुलुंड (पश्चिम), मुंबई – ४०० ०८२, **(२)** गाळा क्र. २, २३३, प्रकाश मार्बल इंडस्ट्रियल इस्टेट, पोखरण रोड– १, उपवन व **(३)** गाळा क्र. ३, २३३, प्रकाश मार्बल इंडस्ट्रियल इस्टेट, पोखरण रोड – १, उपवन येथील तीन स्थावर मालमत्तेसह विविध भरपूर मालमत्तेचे एकमेव कायदेशीर मालक होते. माझे अशील नोंदणीकृत असलेल्या सदर मुखत्यारपत्राअंतर्गत नियुक्त कार्यकारी आहेत. आम जनतेस याद्वारे इशारा देण्यात येतो की, सन्मा. मुंबई उच्च न्यायालयाद्वारे घेतलेल्या निर्णयावरून मुखत्यारपत्र याचिकेच्या अंतर्गत मयत यांचे कायदेशीर वारस वा प्रतिनिधी यांच्याकरिता मयत वा कोणाही व्यक्तींचे कायदेशीर वारस यांच्यासह कोणत्याही सदर मालमत्तेचे मालक यांच्या संबंधात कोणाही व्यक्तीने कोणत्याही प्रकारच्या तोंडी, लेखी वा अन्य कोणत्याही स्वरूपातील कोणत्याही करार वा व्यवहारांमध्ये व्यवहार करू नये. जर सदर आम जनतेस, कोणाही व्यक्तीस वा संस्था यांनी सदर मालमत्तेसह व्यवहार करण्याकरिता प्रक्रिया केल्यास कोणत्याही स्वरूपातील व्यवहार त्यांनी संपूर्णरित्या स्वत:च्या जबाबदारी व मूल्यावर करावे.
कु. अलिशा पिंटो
वकील, मुंबई उच्च न्यायालय, मुंबई
७०७, ७ वा मजला, एम्बासी सेंटर,
नरिमन पॉईंट, मुंबई – ४०० ०२१.

प्रपत्र क्र. १६
सोसायटीच्या भांडवल/मिळकतीमधील मयत सभासदाचे शेअर्स आणि हितसंबंधाच्या हस्तांतरणासाठी दावे किंवा हरकती मागविणाऱ्या सूचनेचे प्रपत्र
(मोठे प्रकाशन असलेल्या दोन स्थानिक वृत्तपत्रात प्रकाशित करावयाचे)
(उपविधी क्र. ३५ अन्वये)

सूचना

श्री/श्रीम. सैफुद्दीन एन. सोंगरवाला हे **रेकब को– ऑपरेटिव्ह हाऊसिंग सोसायटी लि.** जिचा पत्ता **इ. एस. पाटणवाला मार्ग, घोडपदेव, मुंबई** येथे चे सभासद आणि सोसायटीच्या इमारतीमधील फ्लॅट क्र. ११५ चे धारक यांचे कोणतेही नामनिर्देशन न करता **२६.०५.२००५ रोजी** निधन झाले.
सोसायटी याद्वारे सोसायटीच्या भांडवल/ मिळकतीमधील मयत सभासदाचे सदर शेअर्स आणि हितसंबंधाचे हस्तांतर होण्यास वारस वा वारसदार वा इतर दावेदार/आक्षेपदार किंवा अन्य दावेदारी/आक्षेप घेणारे यांच्याकडून दावे किंवा आक्षेप असल्यास ते सदर सूचनेच्या प्रसिध्दीपासून **१५ दिवसात** सोसायटीच्या भांडवल/मिळकतीमधील मयत सभासदाच्या शेअर्स व हितसंबंधाच्या हस्तांतरणासाठी त्याच्या/तिच्या/त्यांच्या दाव्या/आक्षेपांच्या पुष्ठ्यर्थ अशी कागदपत्रे आणि अन्य पुराव्यांच्या प्रतींसह मागवित आहे. वर दिलेल्या मुदतीत जर दावे/आक्षेप प्राप्त झाले नाहीत, तर सोसायटीच्या उपविधीतील तरतुदीमधील दिलेल्या मार्गाने सोसायटीच्या भांडवल/मिळकतीमधील मयत सभासदाचे शेअर्स व हितसंबंधाचे हस्तांतर करण्यास सोसायटी मोकळी असेल, जर, सोसायटीच्या भांडवल/ मिळकतीमधील मयत सभासदाच्या शेअर्स आणि हितसंबंधाच्या हस्तांतरणास काही दावे/आक्षेप सोसायटीने प्राप्त केले तर, सोसायटीच्या उपविधीतील तरतुदीनुसार त्यावर सोसायटी कार्यवाही करेल. सोसायटीच्या नोंदणीकृत उपविधीची प्रत दावेदार/आक्षेपकांद्वारे निरीक्षणासाठी सोसायटीचे कार्यालय/सोसायटीचे सचिव यांचेकडे **सोमवार ते शनिवार, स. १०.०० ते सायं. ५.०० वा. दरम्यान** सदर सूचना प्रसिध्दीच्या तारखेपासून तिचा कालावधी समाप्तीच्या तारखेपर्यंत उपलब्ध आहे.

रेकब को– ऑपरेटिव्ह हाऊसिंग सोसायटी लि.
ठिकाण : मुंबई च्या वतीने आणि करिता
दिनांक : १७.०६.२०२० अध्यक्ष/सन्मा. सचिव/सन्मा. खजिनदार

विशेष वसुली आणि विक्री अधिकारी यांचे कार्यालय
"गिरिराज", डॉ. बी. जी. पालकर मार्ग, बोरिवली (पश्चिम), मुंबई-४०० ०९२. दूरध्वनी क्र. : (०२२) २८३३८०९२, २८३३८०१३.
(जनसेवा सहकारी बँक (बोरिवली) लिमिटेडशी संलग्नित)
पपत्र "झेड"
(नियम १०७ चा पोटनियम ११ (डी-१) पहा)

स्थावर मिळकतीकरिता कब्जा सूचना

ज्याअर्थी निम्नस्वाक्षरीकारांनी **जनसेवा सहकारी बँक (बोरिवली) लि. चे वसुली अधिकारी** म्हणुन **महाराष्ट्र को–ऑपरेटिव्ह सोसायटीज रुल्स, १९६१** अन्वये न्यायनिर्णित ऋणको म्हणजेच कर्जदार आणि हमीदार यांना बोलाविण्यासाठी **दि. ०९/०६/२०२०** रोजीच्या जप्ती सूचनेच्या आदेशाचे पालन करुन **दिनांक १०/०२/२०२० रोजीच्या वसुली प्रमाणपत्र क्र. १०१/१३२१/२०१९** करिता **१२/०२/२०२० रोजी मागणी सूचना** जारी केली होती.
मे. तिरुपती चैन्स (प्रोप्रायटर श्री. किरण मनहरलाल मेहता) सह इतर न्यायनिर्णित ऋणको **सौ. मोना किरण मेहता, श्री. किर्ती मनहरलाल मेहता, आणि सौ. शोभा किर्ती मेहता** यांनी सदर सूचना प्राप्त झाल्याच्या तारखेस **३१/०१/२०२०** रोजीस **रु. ७,२३,५१,६६२.१८ (रुपये सात कोटी तेवीस लाख एकावन्न हजार सहाशे बासष्ट आणि पैसे अठरा मात्र)** सह वसुली पर्यंतचे **द. सा. १५% दराने** पुढील व्याज अशी **दिनांक १२/०२/२०२० रोजीच्या सदर मागणी सूचनेत** नमुद केलेली रक्कम अदा करायची होती आणि न्यायनिर्णित ऋणकोंनी सदरहू रक्कम चुकती करण्यास कसूर केलेली आहे म्हणुन निम्नस्वाक्षरीकारांनी जप्तीची सूचना जारी केली आणि खालील वर्णन केलेली मिळकत जप्त केली आहे.
न्यायनिर्णित ऋणकोंनी सदरहू रक्कम चुकती करण्यास कसूर केलेली आहे म्हणुन न्यायनिर्णित ऋणको आणि सर्वसामान्य जनतेला सूचना याद्वारे देण्यात येते की, निम्नस्वाक्षरीकारांनी सदर **०९ जून, २०२०** रोजी **महाराष्ट्र को–ऑपरेटिव्ह सोसायटीज् रुल्स, १९६१ च्या नियम १०७ (११ (डी–१)** अन्वये त्यांना प्रदान केलेल्या अधिकाराचा वापर करुन येथील खालील वर्णन केलेल्या **मिळकतीचा कब्जा** घेतला आहे.
विशेषत: न्यायनिर्णित ऋणको आणि सर्वसामान्य जनतेला याद्वारे सावधान करण्यात येते की, सदरहू मिळकतीशी व्यवहार करू नये आणि सदरहू मिळकतीशी केलेल्या कोणताही व्यवहार हा **३१/०५/२०२०** रोजीस **रु. ७,६३,३७,४७१.१८ (रुपये सात कोटी त्रेसष्ट लाख सदतीस हजार चारशे एकाहत्तर आणि पैसे अठरा मात्र)** सह त्यावरील **द. सा. १५%** दराने पुढील व्याज या रकमेकरिता **जनसेवा सहकारी बँक (बोरिवली) लि., मुंबई** च्या प्रभाराच्या अधीन राहील.

जप्तीसाठी मिळकतीचे परिशिष्ट

चे सर्व भाग आणि विभाग

१) फ्लॅट क्र. बी/७०१, मोजमापित ६४० चौ. फू. चटई क्षेत्र, सातवा मजला, बिल्डिंग क्र. १, ॲमेझॉन को–ऑपरेटिव्ह हाऊ. सोसा. लि., सोडावाला लेन एक्स्टें., जयराज नगर बोरिवली (पश्चिम), मुंबई – ४०००९२. सोसायटीचा नोंदणी क्र. बीओएम/डब्ल्यूआर/एचएसजी/(टीसी)/१०७७०–२०००, उप–प्लॉट क्र. ए/१, सी.टी.एस. क्र. २६८/ए, २६९, २७४ गाव बोरिवली तालुका बोरिवली, एम.एस.डी. **(श्री. किरण मनहरलाल मेहता आणि सौ. मोना किरण मेहता यांच्या मालकीचा).**
२) फ्लॅट क्र. बी/७०२, मोजमापित ३२० चौ. फू. चटई क्षेत्र, सातवा मजला, बिल्डिंग क्र. १, ॲमेझॉन को–ऑपरेटिव्ह हाऊ. सोसा. लि., सोडावाला लेन एक्स्टें., जयराज नगर बोरिवली (पश्चिम), मुंबई – ४०००९२. सोसायटीचा नोंदणी क्र. बीओएम/डब्ल्यूआर/एचएसजी/(टीसी)/१०७७०–२०००, उप–प्लॉट क्र. ए/१, सी.टी.एस. क्र. २६८/ए, २६९, २७४ गाव बोरिवली तालुका बोरिवली, एम.एस.डी. **(सौ. मोना किरण मेहता आणि श्री. किरण मनहरलाल मेहता यांच्या मालकीचा).**
३) फ्लॅट क्र. बी/७०३, मोजमापित ३२० चौ. फू. चटई क्षेत्र, सातवा मजला, बिल्डिंग क्र. १, ॲमेझॉन को–ऑपरेटिव्ह हाऊ. सोसा. लि., सोडावाला लेन एक्स्टें., जयराज नगर बोरिवली (पश्चिम), मुंबई – ४०००९२. सोसायटीचा नोंदणी क्र. बीओएम/डब्ल्यूआर/एचएसजी/(टीसी)/१०७७०–२०००, उप–प्लॉट क्र. ए/१, सी.टी.एस. क्र. २६८/ए, २६९, २७४ गाव बोरिवली तालुका बोरिवली, एम.एस.डी. **(सौ. मोना किरण मेहता आणि श्री. किरण मनहरलाल मेहता यांच्या मालकीचा).**
४) दुकान क्र. २०२, मोजमापित ५०० चौ. फू. चटई क्षेत्र दुसरा मजला, सन प्लाझा, डायमंड टॉकिज समोर, एल.टी. रोड, बोरिवली पश्चिम, मुंबई – ४०००९२. अंतिम प्लॉट क्र. १०५ ऑफ टी.पी.एस. III, सी.टी.एस. क्र. २७८२ आणि २७८२/ए, एक्सर गाव, तालुका बोरिवली एम. एस. डी. **(श्री. किरण मनहरलाल मेहता यांच्या मालकीचा).**
५) फ्लॅट क्र. ४०२, पद्मनाभ बिल्डिंग, एस.एन. रोड क्र. ८, जे.व्ही.पी.डी., जुहू, विलेपार्ले (पश्चिम), मुंबई – ४०००४९. **(श्री. किर्ती मनहरलाल मे